**स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रचारामध्ये प्राण्यांचा वापर करण्यास प्रतिबंध करणेबाबत.**

## राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/मनपा/२०११/प्र.क्र. २६/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक- २३/१२/२०११

### परिपत्रक

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, या निवडणुकांमध्ये निवडणूक लढविणारे उमेदवार तसेच राजकीय पक्ष निवडणूक प्रचारासाठी किंवा काही बाबींचा निषेध करण्यासाठी प्राण्यांचा वापर करतात. यामध्ये बैल, हत्ती, गाढव, इ. प्राण्यांना चपलांचा हार घालणे, त्यांच्या तोंडाला काळे फासणे इ. प्रकारे त्यांचे हाल करण्यात येतात. हे प्रकार अमानवी असून प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम, १९६०(Prevention of Cruelty to Animals Act, 1960) च्या उद्देशाशी विसंगत आहेत. या अधिनियमाच्या कलम ११ व ३१ च्या तरतुदीन्वये अशी कृती दखलपात्र गुन्हे आहेत. त्यामुळे राज्य निवडणूक आयोग असे आदेश देत आहे की, यापुढे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या प्रचारामध्ये किंवा यासाठी काढण्यात येणाऱ्या मिरवणुकांमध्ये प्राण्यांचा वापर करण्यास राजकीय पक्ष, निवडणूक लढविणारे उमेदवार तसेच इतर सर्व संबंधितांना प्रतिबंध करण्यात यावा. तसेच या सूचनांचे पालन न करणाऱ्यांविरुध्द फौजदारी कारवाई करण्यात यावी.

नीला सत्यनारायण
( नीला सत्यनारायण )
२३/१२/११
राज्य निवडणूक आयुक्त,
महाराष्ट्र

प्रति,
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व महानगरपालिका आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी.
सर्व नगर परिषदा / नगर पंचायतींचे मुख्याधिकारी.
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने.

D:\OSD\doc\DO